# फौजदारी किरकोळ अर्ज नं.१२/२०२६

## नि. क्र. ०१ वरील आदेश

**(सिध्देश पवार वि. महाराष्ट्र शासन व.२)**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये दाखल केलेला आहे. आजरोजी अर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ हजर. अर्जदार व तर्फे विद्वान विधिज्ञ यांनी नि.०४ येथे अर्ज देवून अर्जदार याचा मोबाईल आरोपी याचेकडून जप्त केलेला होता तो हमीपत्रावर मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला होता. सदर मोबाईल नियमित फौजदारी खटला क्र.२४/२०२६ या केसमध्ये जप्त होता. सदर केस ओरोस सत्र न्यायालयात वर्ग झालेली आहे. सदरचा मोबाईल मिळणेकरिता अर्ज सत्र न्यायालयात करणे गरजेचे आहे. तसा अर्ज सत्र न्यायालयात दाखल करणेचा हक्क राखून ठेवून हा अर्ज निकाली करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज यापुढे चालवायचा नसल्याचे सदर निशाणी ०४ वरील पुरशिसमध्ये नमूद असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार याने अर्जात नमुद केलेले कारण पाहता सदरचा अर्ज प्रलंबित ठेवणे न्यायोचित दिसून येत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## –::– आदेश –::–

अर्जदार याने नि.०४ कडे दाखल केलेल्या पुरशिसनुसार प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सही/–

दिनांक–२१.०४.२०२६.

(जी.ए.कुलकर्णी )

न्यायदंडाधिकारी, वर्ग–१ कुडाळ.